दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.** 11 **दिनांक :** 5, एप्रिल 2019

## मुंब्र्यातील विविध शाळांमध्ये चुनावी पाठशालाचे आयोजन

ठाणे (5): कल्याण लोकसभा मतदारसंघातंर्गत येत असलेल्या कळवा मुंब्रा विधानसभा मतदार संघ 149 अंतर्गत आज मुंब्रा ठाकूरपाडा येथील नाईस स्कूल, ठामपा शाळा क्र. 78, संतोषनगर येथील अलहयात स्कूल येथेही आज मोठ्या प्रमाणात चुनाव पाठशाला हा उपक्रम मुंब्रा सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व पटवून देत विद्यार्थ्यानी आपल्या पाल्यांना मतदान करण्यासाठी भाग पडावे तसेच नातेवाईक व शेजारी यांना देखील मतदान करण्यास सांगावे यासाठी या चुनाव पाठशालाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी हा भविष्यात एक सक्षम नागरिक बनणार असल्यामुळे शालेय वयातच त्यांना मतदान व लोकशाहीबद्दल माहिती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांमध्ये देखील जनजागृती करण्यात येत आहे. तसेच चुनाव पाठशाला बरोबरच यंदा मतदानाच्या व्हीव्हीपॅट मशीनचे प्रात्याक्षिक देखील दाखविण्यात आले. यावेळी शाळांमधील प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच नागरिकांना व्हीव्हीपॅट मशीनच प्रात्याक्षिक दाखविण्यात आले.